गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तन



# भारती विद्यापीठाचे
# डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय,सांगली

# संवाद - भारती

**A Tri - Monthly News Letter**

July-Sept :2016




संपादक मंडळ

अध्यक्ष : डॉ.डी.जी.कणसे

मुख्य संपादक : डॉ.संतोष माने

कार्यकारी संपादक :प्रा.अमोल वंडे

सदस्य:

डॉ.बी.डी.पाटील

प्रा.एम्.एच्.पाटील

संवाद भारती विशेष

# "आला पावसाळा, आरोग्य सांभाळा"



**पावसाळा आला, आरोग्य सांभाळा असे म्हटले जाते. पावसाळी व्याधी, आजारपण अन् साथीची लागण हे आता नेहमीचेच झाले आहेत. डेंग्यू, मलेरिया, स्वाईन फ्लु, हिंवताप, पडसे, कांजिण्या वगैरेचे आजार शहरात व ग्रामीण भागातसुद्धा आढळून येतात. डासांची पैदास पावसाळ्यात भरपूर प्रमाणात होत असल्याने मलेरियाचा ताप अनेकांना आजारी करून टाकतो. डेंग्यू डासांपासून होत असल्याने हा डेंग्यू कधी कधी जीवघेणा ठरतो. शहरात डेंग्यू तापाने अनेक माणसे दगावतात. म्हणून या आजाराचे योग्यवेळी निदान आवश्यक आहे. अनेक शहरांत मागे स्वाईन फ्लूची लागण होऊन अनेकांना आपला प्राण गमवावा लागला. पुणे, मुंबई, दिल्ली वगैरे शहरांत डेंग्यू व स्वाईन फ्लूच्या साथी हमखास पावसाळ्यातच येत असतात.**

मागे 'बर्ड फ्लू' नावाची एक साथ आली होती. या फ्लूचा व्हायरससुद्धा जीवघेणा व अनेक माणसे या आजारातपण दगावायची. म्हणून पावसाच्या दिवसात वैयक्तीक अन् परिसराची स्वच्छता पण अत्यंत आवश्यक. घाण, कचरा, चिखल व पाणी तुंबून ठेवणारी गटारे यामुळे अशा जीवघेण्या आजारांची लागण जलद होत असते. शहरात उघडी गटारे, चिखल, घाण यांचे साम्राज्य असते. अनेक ठिकाणी घाण पाणी तुंबून राहते व जीवघेण्या जंतूंची, डासांची पैदास मोठ्या प्रमाणात होते. टायफॉईड, कॉलरा तापाच्या साथीपण शहरात पावसाळी दिवसांत येत असतात. त्यांचा उद्भव प्रामुख्याने घाण व पाणी तुंबल्यामुळे होत असतो. म्हणून आपला परिसर अतिस्वच्छ व साफ ठेवणे अगत्याचे आहे.

तंदुरुस्त आरोग्यासाठी काही पथ्ये काटेकोरपणे पाळावी लागतात व पावसाला आपण दोष देऊ शकत नाही. आपणच निर्माण केलेला कचरा, घाण, सांडणारे पाणी यांनाच दोष द्यावे लागेल. पण ऐकतो कोण? जो तो स्वतःपुरते पाहतो. पावसाळी आजार म्हणजे सर्दी, पडसे व ताप. लहान मुलांना तर या सर्दी तापाची लागण जलद होत असते. त्यांची पचनसंस्था नाजूक असल्याने कोणत्याही आजाराची – अर्थात ताप, खोकला, कांजिण्या, गोवर, अतिसार यांची बाधा हटकून होते. त्यावर वेळीच डॉक्टरी इलाज व्हायला हवेत. अतिसाराने (डायरिया) अनेक मुले दगावतात. कारण नेमक्यावेळी इलाज होत नाहीत. डीहायड्रेशन अर्थात शरीरातील पाणी जलद कमी होत जाते व वेळीच वैद्यकीय उपचार केले गेले नाहीत, दुर्लक्ष झाले, तर अक्षरशः मुले दगावण्याचीही शक्यता असते.

अगदी प्रौढ माणसांनासुद्धा कॉलरा, अतिसार, मलेरिया, स्वाईन फ्लुचे आजार होऊन प्रकृती गंभीर बनते. म्हणून पावसाळा आला की, अनेकांचे आरोग्य बिघडते. अगदी पैलवान असला तरी आजाराने आडवा होतो. आपले आरोग्य तंदुरुस्त ठेवणे शक्य तितके आपल्याच हाती असते. अभक्ष्य भक्षण करणे, अति तिखट, तेलकट खाणे, अति खाणे यामुळे व मद्य सेवनाचा अतिरेक, धुम्रपान, गुटखा खाणे, तंबाखू चघळणे यामुळे आपली प्रकृती जलद ढासळते व आपण अनेक रोगांचे शिकार बनतो.

आरोग्यम् धन संपदा असे सार्थपणे म्हटले जाते. कारण अलोट पैसा, धन असले म्हणून वाया गेलेले आरोग्य पुन्हा संपादन करता येत नाही. आरोग्य सांभाळण्यात आपण किती काटेकोर असतो यावर सारे निर्भर आहे. कर्करोग, अतिरक्तदाब, मधुमेह, हृदयरोग यामुळे आज असंख्य माणसे दगावतात. या रोगांच्या आणि आजाराच्या मुळाशी आपली अत्याधुनिक जीवनशैली व व्यसने कारणीभूत आहेत. फास्ट फूड व तणावपूर्ण जीवन यामुळे अनेकांना हृदयाचे आजार, मधुमेह, उच्च रक्तदाब यांसारख्या आजारांची शिकार व्हावे लागते. माणसाच्या आज गरजा वाढत आहेत. पण त्या वाढवून घेतलेल्या आहेत. भोगवाद, चंगळवाद यांची कास धरल्यामुळे अनेकांना अकाली प्रौढत्व, धनसंपत्तीची हाव सारखी वाढत आहे. पूर्वीची पारंपरिक, साधीसुधी जीवनशैली नाहीशी होऊन आज चैनी, विलासी जीवनाकडे माणसे वळत आहेत. त्यासाठी भक्कम पैसा हवा. या शर्यतीमध्ये माणूस आपले आरोग्य गमावून बसला आहे. कष्ट, श्रम यांचा विसर पडला आहे. शेती, बागायती करणे आज कुणालाच आवडत नाही. अशाने आरोग्याची दैना झालेली आहे. आपण आपले आरोग्य सांभाळायला हवे. कारण शरीर व हे आरोग्य आपल्याला निसर्गाची देण आहे. त्याचे आपण योग्य जतन व रक्षण करायला हवे. परंतु शेवटी मृत्यू कुणालाच चुकत नाही. पण म्हणून मरण जवळ का आणायचे?

आरोग्य हेच आपले धन मानून आपण त्याचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे. आपल्या आरोग्याची हेळसांड आयुष्याच्या उत्तरार्धात खूप तापदायक ठरू शकते. त्यामुळे आपणच आपल्या आरोग्याची, प्रकृतीची काळजी घेतली पाहिजे. पावसाळ्याच्या दिवसांत तर अधिकच काळजी घेतली पाहिजे. तरच आपले जीवन सुखमय होईल.

तरुण भारत
रविवार दि. ३ जुलै २०१६

# दुष्काळ निवारणासाठी वृक्षसंवर्धनाची क्रांती आवश्यक

## डॉ. पतंगराव कदम : बॉटॅनिकल गार्डनचे उद्‌घाटन

प्रतिनिधी
सांगली

गेल्या काही वर्षात महाराष्ट्र राज्यात दुष्काळ पडत चालला आहे. त्याचे कारण राज्यामध्ये असणाऱ्या वनक्षेत्राचे प्रमाण अत्यल्प आहे. यासाठी राज्यामध्ये वनक्षेत्र वाढावे यासाठी १०० कोटी वृक्षलागवडीची योजना केली होती. त्या अंतर्गत सध्याच्या सरकारने वनमहोत्सव सप्ताह दोन कोटी वृक्षलागवड करणे व त्यांचे संवर्धन करणे हा उपक्रम समाज विधायक असल्यामुळे राज्यातील दुष्काळ कायमस्वरूपी निवारण्यासाठी वृक्षसंवर्धनाची क्रांती निर्माण झाली पाहिजे, असे गौरवोद्‌गार माजी मंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी केले.

येथील भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात सांगली, मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने वनमहोत्सव अंतर्गत १ जुलै २०१६ रोजी वृक्ष लागवडी निमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. पतंगराव कदम बोलत होते. या व्यासपीठावर सांगलीचे आमदार सुधीर गाडगीळ, जयश्रीताई पाटील, महापौर हारूण शिकलगार, स्थायी सभापती संतोष पाटील, माजी आमदार दिनकर पाटील, शिक्षण महासंचालक डॉ. अजय साळी, विभागीय डॉ. एच.एम.कदम, प्रा. डॉ.डी.कणसे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी पतंगराव कदम म्हणाले, राज्यामध्ये विदर्भ, चंद्रपूर यांच्या तुलनेमध्ये मराठवाड्यामध्ये वनक्षेत्राचे प्रमाण कमी जास्त आहे. त्याचप्रमाणे पश्चिम महाराष्ट्रातही वनक्षेत्राचे प्रमाण कमी जास्त आहे. त्यामुळे राज्यामध्ये दुष्काळसदृश स्थिती यासहीत अनेक पर्यावरण समस्या निर्माण होत असल्यामुळे यावरती कटिबद्ध कार्यक्रम म्हणून वृक्षलागवड व संवर्धन करणे गरजेचे आहे. पाच राज्यांची फॉरेस्ट अकॅडमी कुंडल येथे असून त्याचे कार्य उत्तम सुरू आहे.

यावेळी आ. सुधीर गाडगीळ उपक्रमांतर्गत लावलेल्या सर्व वृक्षांची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारून त्याचे संवर्धन केले पाहिजे. समाजामध्ये वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनविषयी जनजागृती करून दुष्काळावरती कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची गरज आहे. यावेळी महाविद्यालयाच्या वतीने दोन एकर परिसरामध्ये वनस्पतीशास्त्रीय उद्यान करण्यात आले.



सांगली : वृक्षलागवड शुभारंभ प्रसंगी डॉ. पतंगराव कदम बाजूस जयश्रीताई पाटील व अन्य.

यामध्ये वृक्षलागवड शुभारंभ डॉ. पतंगराव कदम, आ. सुधीर गाडगीळ,जयश्रीताई पाटील, महापौर हारूण शिकलगार, संतोष पाटील, दिनकर पाटील, शिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी, डॉ.एच.एम.कदम, डॉ. डी. जी. कणसे यांच्या हस्ते वृक्षारोपण झाले. यामध्ये पहिल्या टप्प्यात केसर आंबा, बेहडा, बिबा, लिंबू, जांभूळ, फणस, वड, पिंपळ, कवठ, रूद्राक्ष, रक्त चंदन आदी औषधी वनस्पती मान्यवरांच्या व तसेच प्राध्यापक विद्यार्थी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले आहे.

यासाठी दिलीप पाटील, चौगुले, प्रा. एम. एच. पाटील, डॉ. बी. डी. पाटील, डॉ. संतोष माने यांच्यासहीत विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेत्तर सेवक, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

केसरी

# जागतिक कौशल्यदिनानिमित्त व्याख्यान उत्साहात

सांगली : प्रतिनिधी

डॉ.कदम महाविद्यालय येथे १५ जुलै जागतिक कौशल्य दिना निमित्त 'कौशल्य विकास व रोजगाराच्या संधी' या विषयावर सांगलीचे कौशल्य योजना अधिकारी संजय माळी यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. कणसे हे होते. स्वागत प्रा. डॉ. भीमराव पाटील यांनी केले. आभार प्रा. माणिक पाटील यांनी मानले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. समन्वयक म्हणून प्रा. डॉ. नितीन गायकवाड यांनी काम पाहिले.



डॉ.कदम महाविद्यालयात जागतिक कौशल्य दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना संजय माळी. समवेत प्रा. डॉ. कणसे.

दैनिक ललकार

२४/७/२०१६

# शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालयासाठी डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाची निवड

सांगली दि. २३ - शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या अभिनव योजने अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या अग्रणी महाविद्यालयासाठी येथील भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाची निवड झाली असल्याचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी सांगितले.

अग्रणी महाविद्यालयातर्फे विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकीय सेवक, तसेच समाजाभिमुख उपक्रम राबविणे, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, संशोधन क्षेत्रातील कार्यशाळा, चर्चासत्र, परिसंवाद आदी अनुषंगाने नाविण्यपूर्ण उपक्रम शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील नियुक्त केलेल्या दहा महाविद्यालयातून अग्रणी महाविद्यालयाच्या नेतृत्वाखाली संपन्न केले जातात. भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय प्रमुख अग्रणी महाविद्यालय अंतर्गत सांगलीतील गरवारे कन्या महाविद्यालय, के.डब्ल्यु.सी, जी. ए. कॉलेज, एन.डी. पाटील नाईट कॉलेज, शांतिनिकेतन कला महाविद्यालय, न्यु लॉ कॉलेज, एन.एस. लॉ कॉलेज यांचेसहीत एस.के. पाटील महाविद्यालय कुरुंदवाड, घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर, जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर आदी महाविद्यालयाचा अग्रणी योजनेत समावेश आहे.

ग्रामीण व शहरी संस्कृतीचा समन्वय साधत भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाने त्रिदशकीय वाटचाली पूर्ण केली आहे. राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषद, बेंगलोर यांचे अ-दर्जा प्राप्त करुन शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात उत्कृष्ट व गुणवत्ता



वर्धिष्णू महाविद्यालय म्हणून प्रतिमा निर्माण केली आहे. विद्यार्थ्यांचा अंगीकृत गुण, कौशल्य विकसित होण्यासाठी व नवीन तंत्रज्ञान अवगत होण्यासाठी महाविद्यालयाने आतापर्यंत नाविन्यपूर्ण उपक्रम यशस्वीरित्या संपन्न केले आहेत. विद्यार्थ्यांच्या संख्यात्मक व गुणात्मक वाढीसाठी अत्याधुनिक सोयी सुविधा महाविद्यालयात उपलब्ध असल्यामुळे ११ ते पदव्युत्तरपर्यंत १८०० हून अधिक विद्यार्थी महाविद्यालयात शिक्षण घेत आहे.

महाविद्यालयाने शिक्षण, संशोधन, कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या नेत्रदीपक प्रगतीची दखल घेवून शिवाजी विद्यापीठाने महाविद्यालयाची अग्रणी महाविद्यालय म्हणून दुसऱ्यांदा निवड केली आहे. शिवाजी विद्यापीठात अग्रणी महाविद्यालय योजना प्रथम सुरु झाली. त्यावेळी सन २००८-२०१३ या कालावधीत महाविद्यालयाने अग्रणी महाविद्यालय योजना प्रथम सुरु झाली त्यावेळी सन २००८-२०१३ या कालावधीत महाविद्यालयाने अग्रणी महाविद्यालय म्हणून उत्कृष्ट कार्य केले. त्यामुळे सन २०१६-२०१९ पर्यंत या कालावधीसाठी महाविद्यालयाची दुसऱ्यांदा अग्रणी महाविद्यालयासाठी निवड झाली आहे. अग्रणी महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. प्रदीप डिकुळे हे कार्य पाहत आहेत. महाराष्ट्र शासनाचा राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार प्राप्त करणाऱ्या या महाविद्यालयाची दुसऱ्यांदा अग्रणी महाविद्यालय म्हणून निवड झाली हे गुणवत्ता व दर्जा वाढविण्यास कारणीभूत ठरले आहेत. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या अनमोल मार्गदर्शनाखाली अग्रणी महाविद्यालय योजना कार्यरत आहे. महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ संचालक डॉ. आर. डी. मोरे यांनी अग्रणी महाविद्यालय नियुक्तीचे पत्र महाविद्यालयास दिले असल्याचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी प्रसिद्ध पत्रकाव्दारे सांगितले.



पुण्य नगरी

रविवार, २१ ऑगस्ट २०१६

# चालक-वाहकांना राखी बांधून रक्षाबंधन

## डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचा उपक्रम



सांगली : चालक-वाहकांना राखी बांधताना डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी. सोबत प्रा. टी. आर. सावंत, डॉ. नितीन गायकवाड आदी.

**सांगली / प्रतिनिधी :**

चोवीस तास प्रवाशांना अविरत सेवा देणाऱ्या सांगली आगारातील एस. टी. चालक-वाहकांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा केला. डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. याशिवाय दादूकाका भिडे निरीक्षणगृहातील मुलांना, ट्रकचालकांना तसेच वृक्षांना राखी बांधून सामाजिक बांधिलकीचा संदेश विद्यार्थिनींनी दिला. विशेष म्हणजे या राख्या स्वतः विद्यार्थिनींनी तयार केल्या होत्या.

सांगलीवाडी येथील टोलनाक्याजवळ हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.जी. कणसे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. टी. आर. सावंत यांचे प्रोत्साहन लाभले. यावेळी डॉ. बी. डी. पाटील, प्रा. उज्ज्वला देसाई, प्रा. पी. एस. डिकुळे, प्रा. ए. एन. मोरे, प्रा. सुलभा तांबडे, डॉ. नितीन गायकवाड यांच्यासह विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

तरुण भारत

शुक्रवार, १९ ऑगस्ट २०१६



**सांगली : डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, ग्रंथपाल प्रा. जे. डी. हाटकर, डॉ. बी. डी. पाटील, प्रा. एम. एच. पाटील, प्रा. पी. आर. कुंभार, सर्व प्राध्यापक व विद्यार्थी.**

# कदम महाविद्यालयात ग्रंथदिन उत्साहात

**सांगली :** डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात ग्रंथदिन उत्साहात पार पडला. यावेळी ग्रंथालय विभागाच्यावतीने ग्रंथालय शास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांच्या हस्ते डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना प्राचार्य कणसे म्हणाले, आजच्या संगणक युगात युवा पिढीत पुस्तक वाचनाविषयी उदासिनता दिसून येते. ज्ञानाने श्रीमंत होण्यासाठी विद्यार्थ्यांनी चांगल्या पुस्तकांचे वाचन केले पाहिजे. युवा पिढीची पाऊले ग्रंथालयाकडे वळली पाहिजेत. त्यासाठी ग्रंथालयातील पारंपारिक वाचन साहित्याबरोबरच इ-बुक व इ-जर्नल्स चा वापर करावा. ग्रंथपाल जे.डी.हाटकर यांनी प्रास्ताविक करत डॉ. रंगनाथन यांच्या कार्याचा आढावा घेतला. यावेळी डॉ. बी. डी. पाटील, प्रा. एम. एच. पाटील, प्रा. प्रभा पाटील, प्रा. पी. आर. कुंभार यांच्यासह सर्व प्राध्यापक, ग्रंथालय कर्मचारी, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

केसरी

सांगली, १४ जुलै २०१६



डॉ. कदम महाविद्यालयात विद्यार्थ्यांना बस पासचे वितरण करताना प्राचार्य डॉ. कणसे, प्राचार्या सुलक्षणा कुलकर्णी आदि.

# डॉ. कदम महाविद्यालयात बस पास वितरणास प्रारंभ

**सांगली : प्रतिनिधी**

राज्य परिवहन सांगली आगाराच्या वतीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सवलत पास योजनेची सुरुवात डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय येथून करण्यात आली. आता मुलांना एस.टी. बस पाससाठी आगारात जावे लागणार नाही. या योजनेची सुरुवात भारती विद्यापीठाचे मानद संचालक डॉ. एच. एम. कदम, प्राचार्य डॉ. कणसे, प्राचार्या सुलक्षणा कुलकर्णी, दत्ता मोहिते, वाहतूक नियंत्रक दिलीप बर्गे, एस. एस. कोलालीकर यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती देण्यात आली. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा एस.टी. राज्य परिवहन मंडळाचा उपक्रम स्तुत्य असल्याने त्याचे सर्वत्र स्वागत होत आहे.

पुण्य नगरी

गुरुवार, ११ ऑगस्ट २०१६

3

# भारतातील सर्वोत्कृष्टमध्ये डॉ. कदम महाविद्यालयाचा समावेश

## जिल्ह्यात अव्वल, तर विद्यापीठ कार्यक्षेत्रात तिसरा क्रमांक; ११ हजार कॉलेजचे सर्वेक्षण

**सांगली / प्रतिनिधी**

राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद, बेंगलोर यांचा 'अ' दर्जा प्राप्त करणाऱ्या भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचा उच्च शिक्षणातील भारताच्या सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाच्या यादीत समावेश झाला आहे. जिल्ह्यात डॉ. कदम महाविद्यालय अव्वलस्थानी, तर शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात तिसऱ्या क्रमांकावर असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी दिली.



उच्च शिक्षण क्षेत्रात कला, वाणिज्य आणि विज्ञान या विद्याशाखेत देशात सर्वोत्कृष्ट संख्यात्मक व गुणात्मक वाढ करणाऱ्या महाविद्यालयाची निवड यादी 'करिअर ३६०' या नियतकालिकेत नुकतीच प्रसिद्ध करण्यात आली. आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वेक्षण करणाऱ्या या नियतकालिकेने संपूर्ण देशातील ८२५ विद्यापीठांतर्गत सर्व राज्यातील ११ हजार महाविद्यालयांचे सर्वेक्षण करुन ही निवड यादी प्रसिद्ध केली.

यामध्ये शिवाजी विद्यापीठांतर्गत ५ महाविद्यालयांची निवड झाली असून डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय हे राज्यांत ६२ व्या व शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत तिसऱ्या स्थानावर आहे. 'करिअर ३६०' या नियतकालिकेने महाविद्यालयाच्या वेबसाईट, नॅक मूल्यांकन, वेगवेगळे कोर्स, विद्यार्थी संख्या, उच्चविद्याविभूषित शिक्षक, संशोधन, अत्याधुनिक सोयीसुविधा, युजीसीचे अनुदान, संशोधनातील पेटंट आदी बाबींवरुन संख्यात्मक व गुणात्मक वाढ करणाऱ्या सर्वोत्कृष्ट १०० महाविद्यालयांची नियतकालिकेने निवड केली आहे. यामध्ये डॉ. कदम महाविद्यालयाचा समावेश झाल्याने महाविद्यालयाच्या प्रगतीमध्ये मानाचा तुरा खोवला गेला आहे.

तरुण भारत


बुधवार, २४ ऑगस्ट २०१६

# देशापुढील आव्हानांना शिक्षणाच्या माध्यमातून सामोरे जा : प्रा. कणसे

प्रतिनिधी
सांगली

आपला देश प्रगतीपथावर असताना, दहशतवाद, बेकारी, वाढती लोकसंख्या, नैसर्गिक घटना, महिला अत्याचार, व्यसनाधिनता आदी अनेक समस्या व आव्हाने निर्माण होत आहेत. या सर्वांवर शिक्षणाच्या माध्यमातून सामोरे जाऊन, राष्ट्रीय एकात्मता टिकवणे, ही सर्वांची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. डी.जी. कणसे यांनी केले.

भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. सांस्कृतिक विभागातर्फे विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भावगीत व समुहगीत सादर केले. सुत्रसंचालन प्रा. रुपाली कांबळे यांनी तर, आभार प्रदर्शन प्रा. स्मिता जगताप यांनी केले. यावेळी प्रा. एम.एच.पाटील, डॉ. डी.बी.पाटील, प्रा. पद्माकर जगदाळे, प्रा. एच.व्ही.पवार, प्रा.श्रीकृष्ण मोहिते, डॉ. संतोष माने यांच्यासह सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



सांगली : मार्गदर्शन करताना प्रा. डी. जी. कणसे.

केसरी

२० ऑगस्ट २०१६



डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात एम. एस्सी.च्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात बोलताना प्राचार्य डॉ. कणसे.

# एम. एस्सी.च्या विद्यार्थ्यांचे स्वागत

**सांगली : प्रतिनिधी**

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात प्रथम वर्ष एम. एस्सी. विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. एम. एच. पाटील, डॉ. बी. डी. पाटील, प्रा. पी. एस. डिकुळे, डॉ. अमित सुपले, डॉ. अंकुश सरगर उपस्थित होते. सूत्रसंचालन अनुराधा लवटे यांनी केले. नम्रता कदम यांनी आभार मानले. यावेळी प्राध्यापक व एम. एस्सी. भाग १ व भाग २ चे विद्यार्थी उपस्थित होते

पुण्य नगरी
सोमवार, १९ सप्टेंबर २०१६



सांगली : मतदार नोंदणी जनजागृती अभियानात सहभागी डॉ. डी. जी. कणसे, प्रा. टी. आर. सावंत, प्रा. संजय ठिगळे, डॉ. नितीन गायकवाड आदी.

## मतदान नोंदणी जनजागृती अभियान

**डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचा उपक्रम**

**सांगली / प्रतिनिधी**

भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सांगलीवाडी परिसरामध्ये मतदार नोंदणी जनजागृती अभियान राबवण्यात आले.

अभियानाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी मतदार नोंदणी जनजागृतीचे महत्व सांगितले. भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाहीप्रधान देश आहे. भारतीय राज्यघटनेने एक व्यक्ती एक मत हा अधिकार नागरिकांना दिला असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी विद्यार्थ्यांनी सांगलीवाडी परिसरामध्ये मतदार जागृती फेरी काढली. घरोघरी या अभियानाची माहिती दिली. १६ सप्टेंबरपासून १४ ऑक्टोबरपर्यंत हे अभियान राबविण्यात येणार आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. टी. आर. सावंत, डॉ. जया कुऱ्हेकर, प्रा. उज्वला देसाई, प्रा. पी. एस. डिकुळे, प्रा. संजय ठिगळे, प्रा. अंकुश मोरे, डॉ. बी. डी. पाटील, डॉ. नितीन गायकवाड, प्रा. रुपाली कांबळे यांनी अभियानाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. रॅलीमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग मोठा होता.

पुण्य नगरी
सोमवार, १९ सप्टेंबर २०१६

## सांगलीवाडीत डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे स्वच्छता अभियान

**सांगली / प्रतिनिधी**

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सांगलीवाडीत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. जोतिबा मंदिर परिसरामध्ये अभियानाची सुरुवात करण्यात आली. मंदिर आवारातील झाडेझुडपे काढून विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छ केला.

स्वच्छतेतून समृद्धीसाठी, स्वच्छ भारत सुंदर भारत, स्वच्छता जनाची आणि मनाची अशा घोषवाक्यांनी विद्यार्थ्यांनी जनजागृती केली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांचे प्रोत्साहन, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. टी. आर. सावंत, डॉ. जया कुऱ्हेकर यांचे मार्गदर्शन लाभले. या अभियानामध्ये प्रा. उज्वला देसाई, प्रा. पी. एस. डिकुळे, प्रा. अंकुश मोरे, प्रा. संजय ठिगळे, डॉ. नितीन गायकवाड, प्रा. रुपाली कांबळे आदींनी सहभाग घेतला.

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
सांगली, २४ सप्टेंबर २०१६



डॉ. कदम महाविद्यालयाच्या वर्धापनदिनानिमित्त पुणे येथील डॉ. राजेंद्र उत्तुरकर यांनी एकपात्री नाट्यप्रयोग 'वऱ्हाड निघालं लंडनला' सादर केले. समोर उपस्थित विद्यार्थी.

## कदम महाविद्यालयात 'वऱ्हाड निघालं लंडनला'चे सादरीकरण

**सांगली : प्रतिनिधी**


डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या ३१ व्या वर्धापनदिनानिमित्त सांस्कृतिक विभागाच्या वतीने पुणे येथील प्राचार्य डॉ. राजेंद्र उत्तुरकर यांच्या 'वऱ्हाड निघालं लंडनला' या एकपात्री नाट्यप्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले.

प्राचार्य डॉ. कणसे यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभागाच्या प्रा. लक्ष्मण देशपांडे लिखित 'वऱ्हाड निघालं लंडनाला' या एकपात्री नाटकाचे सादरीकरण प्राचार्य उत्तुरकर यांनी एकपात्री प्रयोगातून केले.

उत्तुरकरांच्या आवाजातील मार्दव, गोडवा. याच्या अनुभवाने विद्यार्थी मंत्रमुग्ध होऊन गेले. उद्घाटन भारती कला अकादमीचे प्राचार्य उत्तुरकर, प्रा. राजेंद्र ढोणे, अनुप राऊत, प्राचार्य कणसे यांचे हस्ते करण्यात आले. मान्यवरांचा सत्कार प्राचार्य कणसे यांच्या हस्ते करण्यात आला. स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य कणसे यांनी केले. आभार प्रा. प्रभा पाटील यांनी मानले.

यावेळी डॉ. बी. डी. पाटील, प्रा. एम. एच. पाटील, प्रा. संजय ठिगळे, डॉ. संतोष माने, डॉ. नितीन गायकवाड, प्रा. रुपाली कांबळे आदी उपस्थित होते.

केसरी १
३० ऑगस्ट २०१६



डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्यावतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

# डॉ. कदम महाविद्यालयाचे स्वच्छता अभियान

**सांगली प्रतिनिधी**

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वच्छ भारत अभियानांतर्गत विद्यालय परिसर स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

यावेळी प्राचार्य डॉ. कणसे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. बी. डी. पाटील, एन. एस. एस. विभागाचे प्रकल्प अधिकारी प्रा. टी. आर. सावंत, डॉ. जया कुन्हेकर उपस्थित होते. स्वागत डॉ. प्रा. टी. आर. सावंत यांनी केले. आभार प्रा. कुन्हेकर यांनी मानले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या १५० स्वयंसेवकांसह प्राचार्य कणसे, प्रा. पाटील, प्रा. डी. बी. पाटील, प्रा. सावंत, प्रा. कुन्हेकर, प्रा. ए. एन. मोरे, प्रा. उज्वला देसाई, प्रा. प्रदीप डिकुळे, प्रा. रुपाली कांबळे, प्रा. स्मिता जगताप, प्रा. जयश्री हाटकर यांनी सहभाग घेतला.

लोकमत
बुधवार, दि. १४ सप्टेंबर २०१६ ४



सांगलीवाडी (ता. मिरज) येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन डी. आर. मोरे यांच्याहस्ते झाले. यावेळी डॉ. ए. एम. गुरव, डॉ. डी. के. मोरे, भास्कर ताम्हणकर उपस्थित होते.

# शैक्षणिक गुणवत्तेसाठी उच्च दर्जाचे संशोधन हवे : डी. आर. मोरे

सांगली : जागतिक स्तरावर शैक्षणिक गुणवत्ता सिध्द करण्यासाठी उच्च दर्जाचे संशोधन गरजेचे असल्याचे शिवाजी विद्यापीठाचे विकास मंडळाचे संचालक प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी केले.

येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन कक्ष समन्वयक कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी डॉ. ए. एम. गुरव, डॉ. डी. के. मोरे, प्राचार्य भास्कर ताम्हणकर आदी उपस्थित होते.

यावेळी मोरे यांनी देशातील विद्यापीठांमध्ये गुणात्मक वाढ झाली नसल्यामुळे जागतिक पातळीवर विद्यापीठांचा समावेश होत नाही. याच अनुषंगाने अविष्कार संशोधन कक्ष स्थापन करण्यात आले असल्याचे सांगितले. प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विकास आवळे यांनी आभार, तर प्रा. सूर्यकांत बुरुंग यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. बी. डी. पाटील, प्रा. एम. एच. पाटील, डॉ. संतोष माने, डॉ. अंकुश सरगर, प्रा. भारती भावीकुट्टी उपस्थित होते. (वार्ताहर)

# तंत्रज्ञानामुळे शिक्षणात मोठे बदल : राम पवार

सांगली : आधुनिक शिक्षणामुळे पारंपरिक शिक्षणात बदल झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या अध्ययन पध्दतीमध्ये तंत्रज्ञानामुळे अमूलाग्र बदल झाले असले तरी, या बदलांना सामोरे गेले पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. राम पवार यांनी केले. येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी माजी प्राचार्य आर. एस. पाटील, प्रा. आर. जी. देसाई, प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, डॉ. बी. डी. पाटील, प्रा. एम. एच. पाटील, प्रा. श्रीकृष्ण मोहिते आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी प्रा. आर. जी. देसाई, प्रा. पद्माकर, जगदाळे, प्रा. बी. पी. खडके आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी गुणवंत शिक्षकांचा गौरवही करण्यात आला. डॉ. बी. डी. पाटील यांनी प्रास्ताविक केले, तर प्रा. श्रीकृष्ण मोहिते यांनी आभार मानले. प्रा. प्रभा पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. (वार्ताहर)

५ जनप्रवास बातम्यांचा राजा
बुधवार, दि.७ सप्टेंबर २०१६

# भारती विद्यापिठाचे डॉ.संतोष माने यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार

**सांगली ■ प्रतिनिधी**

येथील भारती विद्यापीठाच्या डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ.संतोष माने यांचा चाटे शिक्षण समूह व भास्कराचार्य प्रतिष्ठान औरंगाबाद यांच्याकडून गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. शिक्षक दिनाचे औचित्य साधून येथील खरे मंगल कार्यालयात ज्येष्ठ साहित्यिक प्रा.वैजनाथ महाजन यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

यावेळी चाटे शिक्षण समुहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.एस.जे.पाटील, जिल्हा समन्वयक सादिक मुजावर, प्रशासकीय प्रमुख संजय दळवी, प्राचार्य सचिन पवार, सुदाम पाटील, विजय घोले आदी उपस्थित होते.



गुणवंत शिक्षक पुरस्कार देवून प्रा. डॉ.संतोष माने यांचा सत्कार करताना ज्येष्ठ साहित्यिक प्रा.वैजनाथ महाजन. यावेळी उपस्थित मान्यवर.

डॉ.संतोष माने यांनी अध्यात्मिक, सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरण व संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे, ते भारती विद्यापीठाच्या डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयात गेल्या १४ वर्षापासून भौतिकशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी शिस्तप्रिय व विद्यार्थीप्रिय उपक्रमशील शिक्षक म्हणून नावलौकिक प्राप्त केला आहे . आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील ८० हून अधिक परिषदांमध्ये डॉ.माने यांनी उपस्थित राहून ५६ शोधनिबंध प्रसिद्ध केले आहेत. विश्वजीत फौंडेशनच्या मुलगी हवी अभियान, युवा संकल्प मेळावा, तसेच श्री स्वामी समर्थ केंद्राचा अध्यात्मिक युवक मेळावा, कृषी सत्संग मेळावा आदी उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

शैक्षणिक क्षेत्रासह अध्यात्मक व विज्ञान या क्षेत्रातील उत्तम व उत्तुंग कामगिरीकरीता डॉ.संतोष माने यांना यापूर्वी स्व.खासदार डी.जी.पाटील आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित केलले आहे. यानंतर चाटे शिक्षण समुहचा गुणवंत शिक्षक पुरस्कार मिळाल्याने डॉ.कदम महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीत आणखी मानाचा तुरा खोवला गेला आहे. भारती विद्यापीठाचे संस्थापक डॉ.पतंगराव कदम यांच्या प्रेरणेने कार्यवाह डॉ.विश्वजीत कदम यांचे प्रोत्साहन व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.जी.कसणे याचे मार्गदर्शन त्यांना लाभले.

३ पुढारी गुरुवार १ सप्टेंबर २०१६



सांगली : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय रोईंग स्पर्धा उत्साहात झाल्या.

## शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय रोईंग स्पर्धा उत्साहात

**सांगली (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय रोईंग स्पर्धा येथील माई घाटावर उत्साहात झाल्या. सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांतील ८ महाविद्यालयांच्या २५ खेळाडूंचा उत्स्फूर्त सहभाग होता. जिल्हा क्रीडा अधिकारी अनिल चोरमले यांच्याहस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.जी. कणसे यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन झाले. स्वागत प्रा. पी.डी. जगदाळे आणि आभारप्रदर्शन प्रा.स्मिता जगताप यांनी केले. यशस्वी खेळाडू सिंगल स्कल: प्रथम- अभिषेक खोत (सांगली) द्वितीय- पृथ्वीराज शिंदे ( कोल्हापूर), तृतीय- प्रसाद शिंदे ( सांगली). डबल स्कल : प्रथम- ऋषिकेश शिंदे, इंद्रजित शिंदे ( सांगली), द्वितीय -अंकुश आंबी, विवेक माळी (सांगली), पिअर-प्रथम- रणजित पाटील, पृथ्वीराज यादव ( सांगली), द्वितीय- संकेत पाटील, भारत पाटील (सांगली). डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाने सर्वसाधारण विजेतपद पटकावले. कृष्णा रॉयल बोट क्लब व तरूण मराठा बोट क्लब यांचे सहकार्य लाभले.

३ जनप्रवास शनिवार, दि. ३ सप्टेंबर २०१६



जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन कक्ष समन्वयक कार्यशाळेचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे समवेत प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, प्राचार्य डॉ.आर.जी.कुलकर्णी.

## संशोधनाचा देशाला उपयोग झाला पाहिजे

### डॉ.मोरे : जिल्हास्तरीय आविष्कार कार्यशाळेला प्रतिसाद

**सांगली ■ प्रतिनिधी**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात उच्चशिक्षण क्षेत्रात अमूलाग्र बदल झाला. हा बदल संख्यात्मक पद्धतीने झाल्यामुळे. आज देशात अनेक विद्यापीठ व हजारो

जागतिक स्तरावरील प्रथम दोनशे विद्यापीठाच्या यादीत भारतातील एकाही विद्यापीठाचा समावेश नाही. ही चिंताजनक बाब आहे. यासाठी महाविद्यालय व विद्यापीठाचा गुणात्मक दर्जा सुधारण्यासाठी नाविन्यपूर्ण संशोधनाची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे संचालक प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी केले.

येथील भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ पुरस्कृत जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन कक्ष समन्वयक कार्यशाळा झाली. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी, शिवाजी विद्यापीठ आविष्कार संशोधन समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, डॉ. डी. के. मोरे, - प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हणकर आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. मोरे म्हणाले, उच्च शिक्षण क्षेत्रात गुणात्मक वाढ निर्माण होण्यासाठी अनेक धोरणे शासनाने स्विकारली आहेत. त्याच अनुशंगाने राज्यपालांनी २००५ मध्ये नाविन्यपूर्ण संशोधनात प्रगती करण्यासाठी आविष्कार संशोधन कक्ष स्थापन केला. केंद्राच्या प्रमाणात महाराष्ट्राचा सीजीआर २५ टक्के आहे. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी उच्च शिक्षणातील सीजीआर ३० टक्के झाला तरच भारत महासत्ता होईल. त्याप्रमाणे महाविद्यालयात संशोधनाला चालना दिली पाहिजे. शिवाजी विद्यापीठाने विद्यार्थ्यांना दहा हजार रूपये संशोधन शिष्यवृत्ती, शिक्षकांना ५० हजार शिष्यवृत्ती व संशोधन सफल करण्यासाठी एक ते तीन लाखांचे अनुदान तसेच सर्व मुलींना मोफत एस.टी.पास देण्यात येणार आहे. तर महाविद्यालयात आरोग्य केंद्र उभारणीसाठी विद्यापीठ प्रयत्नशील असल्याचेही ते म्हणाले.

यावेळी प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी प्रास्ताविक व स्वागत व्यक्त करताना महाविद्यालयातील उपक्रमांची माहिती दिली. डॉ. विकास आवळे यांनी आभार मानले. तर प्रा. सुर्यकांत बुरूंग यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. बी. डी. पाटील, प्रा. एम. एच. पाटील, डॉ. संतोष माने, डॉ. अंकुश सरगर, प्रा.भारती भावीकट्टी आदीसह अविष्कार कक्ष समन्वयक, विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ सांगली, शनिवार, १० सप्टेंबर २०१६ ७

## 'नवीन संशोधनाने गुणवत्ता सिद्ध करा'

सांगली, ता. ९ : उच्च दर्जाचे नवीन संशोधन करून गुणवत्ता सिद्ध करा, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे विद्यापीठ व महाविद्यालय विकास मंडळाचे संचालक प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी केले. डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन कक्ष समन्वयक कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. मोरे म्हणाले, "महाविद्यालयांना संशोधनाला चालना मिळण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने विद्यार्थ्यांना १० हजार रुपये संशोधन शिष्यवृत्ती शिक्षकांना ५० हजार रुपये शिष्यवृत्ती व संशोधन प्रकल्पासाठी एक ते तीन लाखांचे अनुदान, सर्व मुलींना मोफत एस. टी. पास देण्याची सुविधा येणार आहे." बी. डी. पाटील, एच. एच. पाटील, संतोष माने, अंकुश सरगर, भारती भावीकट्टी, आर. जी. कुलकर्णी, भास्कर ताम्हणकर, डी. के. मोरे आदी उपस्थित होते. डॉ. डी. जी. कणसे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. आवळे यांनी आभार मानले.



सांगली :डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात आविष्कार संशोधन कार्यशाळेचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे व प्राचार्य डॉ. डी.जी. कणसे आदी.

• Sanvad-Bharati : Monthly News Letter •

(For Private Circulation Only)

**Dr.Patangrao Kadam Mahavidyalaya,Sangli**

dpkm.newsletter@gmail.com

dpkmsangli.bharatividyapeeth.edu